| MHKO050031842016 | समरी क्रि.केस क्र.१०३८/२०१६<br>मधील निशाणी क्र.२३ वरील आदेश<br>अनिल गोपीनाथ जाधव विरुध्द संतोष वसंत पोवार |
|---|---|

सदरचे प्रकरण हे कलम १३८ एन आय ॲक्ट प्रमाणे दाखल असून सदरचा अर्ज निशाणी २३ आरोपीने सीआरपीसी ९१ प्रमाणे दाखल केला असून त्या द्वारे विनंती केली आहे की, फिर्यादीने खालीलप्रमाणे कागदपत्र हजर करावेत. फिर्यादीने आरोपीस जी सुताची बिमे पाठविली व ज्या सायझिंग मार्फत पाठवली त्याबाबत सायझिंगने ॲथोरिटीने फिर्यादीस दिलेले बिल व त्याबाबतचा तपशिल तसेच सायझिंग ॲथोरिटीने जी बिमे आरोपीला दिली त्याबाबत सायझिंग ॲथोरिटीकडून फिर्यादीस मिळालेली कागदपत्रे, फिर्यादीने ज्या व्यापा-याकडून सुतमाल खरेदी केला त्याबाबतची सुत बिल तसेच बिट्रा रिपोर्ट व त्यावर फिर्यादीने इन्कम टॅक्स भरलेबाबतची कागदपत्रे, फिर्यादीने आरोपीस जो सुतमालाचा पुरवठा केला त्याबाबतचे पॅकिंग स्लीप, सुताचा बिट्रा रिपोर्ट, फिर्यादीने आरोपीस कोणत्या क्वॉलिटीचे कापड काढणेस सांगितले होती त्याबाबतची कागदपत्रे, आरोपीने फिर्यादीस वेळोवेळी कापडमालाचा पुरवठा केला आहे त्याबाबत कापडमाल फिर्यादीस मिळालेबातची योग्य ती बिले, फिर्यादीने आरोपीस साडया काढण्यासंबंधी सुतमालाचा पुरवठा केला तेव्हा एका जोडीस किती सुत लागते व त्याकरीता फिर्यादीने कोणता सरकारमान्य फॉम्र्युला वापरला याबाबतची कागदपत्रे तसेच फिर्यादीने आरोपीबरोबर व्यवहार चालू केल्यापासून यातील आरोपीस किती मजूरी दिली तसेच यातील फिर्यादीने आरोपीस दिले कापडामध्ये किती वेस्टेज धरले तसेच किती खराब माल धरला याबाबतची कागदपत्रे, फिर्यादीने आरोपीबरोबर केले व्यवहाराबाबत रोजकिर्द, ताळेबंद, इन्कम टॅक्स किती भरला याबाबतचे रेकॉर्ड ही कागदपत्रे फिर्यादीने याकामी हजर करावेत, अशी विनंती त्यांनी सदर अर्जाद्वारे केली आहे.

२. सदर अर्जावर फिर्यादने निशाणी २७ कडे असे म्हणणे दाखल केले आहे की, सदरचा अर्ज हा खोटा, लबाडीचा व सीआरपीसी कलम ९१ मध्ये नमूद तरतूदी बाहेरचा असल्याने कायदयाने चालण्यास पात्र नाही. अर्ज मोघमस्वरुपी आहे. याकामी फिर्यादीने दि.१७/०९/२०१८ रोजी निशाणी १९ ला सरतपासाचे ॲफिडेव्हीट दाखल केले आहे. तेव्हापासून आरोपीने वेगवेगळी कारणे सांगून याकामी उलटतपास घेण्याचे जाणीवपूर्वक टाळलेले आहे. प्रस्तूतचा अर्ज कायदयाने

चालण्यास पात्र नाही. तरी सदरचा अर्ज नामंजूर करण्यात यावा.

३. दोन्ही पक्षांचा युक्तीवाद ऐकला.

४. अभिलेखावरील दस्तऐवजांचे अवलोकन केले. फिर्यादी यांनी स्वतःची केस शाबित करणे आवश्यक आहे. कलम १०१ भारतीय पूरावा कायदाप्रमाणे कायदयात तरतूद असून दोन्ही पक्षांना त्यांची बाजू मांडण्याची पूरेशी संधी मिळणार आहे. त्यामूळे फिर्यादीने कोणती कागदपत्रे हजर करावीत व कोणती करु नयेत याबाबत न्यायालयाने आदेश पारित करणे न्यायोचित होणार नाही. दोन्ही पक्षांना त्यांचे म्हणणे व बाजू मांडण्याची पूर्णपणे संधी कायदयाप्रमाणे असून कायदयातील तरतूदीप्रमाणे दोन्ही पक्षांनी योग्य त्या स्टेप्स घेवून प्रकरणात कामकाज चालवावे. करीता सदरचा अर्ज व त्यावरील फिर्यादीचे म्हणणे लक्षात घेवून व उपरोक्त सर्व कारणांमूळे मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे-

**<u>आदेश</u>**

१. सदरचा अर्ज नामंजूर करण्यात येतो.

sd/-

**(एम.एम.चौधरी )**
**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,**
**न्यायालय क्र.४, इचलकरंजी**

**इचलकरंजी**
**दिनांकः१२/१२/२०२३.**